# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-6465145/46 कार्यासन दु. क्र. 0712-6465145

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

**अत्यंत महत्वाचे**

क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/Transfer/2017/1566

दिनांक:- 21 JUN 2017

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र एचएमसीटी व वास्तुशास्त्र पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे संस्था बदल (College Transfer) करण्याबाबत

संदर्भ:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. 2/एनजीसी/विसंब /2017/ 690, दि. 16 जुन 2017

शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे संस्था बदल करण्याकरीता संदर्भिय परिपत्रान्वये निकष ठरवून दिलेले आहे. विद्यार्थ्यांना संस्था बदल करण्याकरीता संस्थेने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. संस्था बदल करण्याकरीता विद्यार्थ्यांना ना-हरकत-प्रमाणपत्र (NOC) देण्याकरीता अडवणूक करू नये.
2. विद्यार्थी ज्या संस्थेत शिक्षण घेत आहे त्या संस्थेने विद्यार्थ्यास संस्था बदल करण्याकरीता NOC देतेवेळी संस्था बदलाच्या निकषात बसत असल्यास NOC प्रदान करावी व NOC ही विहित प्रपत्रात असणे बंधनकारण आहे. (संदर्भीय परीपत्रकासह प्रपत्र संलग्न)
3. विद्यार्थ्यांला ज्या संस्थेत बदल करावयाचा आहे अश्या संस्थेने सदरहू विद्यार्थ्यांचा विहित नमुन्यात अर्ज, पालक संस्थेची NOC प्राप्त करून जेवढे विद्यार्थी आपल्या संस्थेत संस्था बदलाने येणार आहे अशा सर्व विद्यार्थ्याचे अर्ज आपल्या संस्थेच्या NOC व रिक्त जागेसह विविध कालमर्यादेत एकत्रित या कार्यालयास सादर करावे.
4. संस्थेने रिक्त जागा दर्शवितांना अचुक दर्शविण्यात याव्या. रिक्त जागांबाबत पुढे काही प्रकरण उद्‌भवल्यास संस्थेचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहितील याबाबत नोंद घ्यावी.
5. विद्यार्थ्यांला **संस्था तसेच अभ्यासक्रम बदलासह व विद्यापीठ बदलासह** ज्या संस्थेत बदल करावयाचा आहे अश्या संस्थेने सदरहू विद्यार्थ्यांचा विहित नमुन्या अर्ज, पालक संस्थेची NOC, (विद्यापीठ बदलाकरीता विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र) प्राप्त करून एकत्रित अहवाल आपल्या संस्थेच्या NOC, रिक्त जागा व Annexure B मध्ये माहिती या कार्यालयास सादर करावी. सदरहू विद्यार्थ्याच्या **संस्था तसेच अभ्यासक्रम बदल व विद्यापीठ बदल** हा तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई मार्फत करण्यात येणार आहे. त्यामुळे संदर्भिय परिपत्रकात नमुद केल्यानुसार विहित मुदतीत कार्यवाही करावी.
6. प्रथम वर्षातून दुस-या वर्षात संस्था बदल करण्याकरीता प्रथम व व्दितीय सत्रात पास होणे किंवा दोन्ही सत्र मिळून एक विषय बॅक असणे आवश्यक आहे. दुसऱ्या वर्षातून तिसऱ्या वर्षात संस्था बदलीकरीता प्रथम वर्ष पुर्ण पास व तृतीय व चुतर्थ सत्रात पास होणे अथवा दोन्ही सत्र मिळून एक विषय बॅक असणे आवश्यक आहे.

7. **संस्था बदलीकरीता आवश्यक कागदपत्रे**:- १) सर्व गुणपत्रिका २) शिक्षण घेत असलेल्या संस्थेची NOC 3) ज्या संस्थेत बदल हवा आहे त्या संस्थेची NOC (रिक्त जागेसह) ४) विहीत नमुन्यात विद्यार्थ्यांचा अर्ज ५) विद्यापीठ पात्रता (आवश्यक असल्यास) ६) संस्था बदलाबाबतची कारणे ७) GAP Certificate (आवश्यक असल्यास) ८) सर्व प्रक्रिया ज्या संस्थेत विद्यार्थ्याला संस्था बदल हवा आहे त्या संस्थेच्या प्राचार्यामार्फत एकत्रित प्रस्ताव तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर येथे सादर करावा.

8. विद्यार्थी अथवा त्यांचे पालक यांना या कार्यालयात संस्था बदलाबाबत प्रस्तावासह पाठवू नये.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर